# ओबीसी पार्टीच्या नेत्या सुप्रिया कोकरे यांचे निधन

मुंबई, शुक्रवार– ओबीसी एनटी पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष संजय कोकरे यांच्या पत्नी सौ. सुप्रिया संजय कोकरे यांचे अल्पशा आजाराने घाटकोपर येथील भटवाडीत राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले व एक मुलगी असा परिवार आहे. सुप्रिया कोकरे यांनी ओबीसी एन.टी.पार्टी ऑफ इंडिया या राजकीय पक्षाची तसेच ओबीसी फाऊंडेशन व ओबीसी विद्यार्थी परिषदेची स्थापना केली आहे. त्यांच्या निधनाने ओबीसी चळवळीची फार मोठी हानी झाली आहे. त्यांच्या अंत्ययात्रेत हजारो कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच आरपीआय नेते राजाराम खरात, ओबीसी नेते संदीप सानप, भटक्या विमुक्त समाजनेते सुधाकर आव्हाड, पत्रकार चंद्रकांत गुरव व संतोष मेढेकर यांनी संजय कोकरे यांचे सांत्वन केले.

नवाकाळ
मुंबई ■ शनिवार, ५ ऑक्टोबर, २०१३ ■